PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2021-22)/ 38/ of 2022**

## परिपत्रक:

**विषय:— दिनांक २५ जानेवारी, २०२२ राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करणेबाबत.**

संदर्भ:— मतदार नोंदणी अधिकारी, सांताक्रुझ (पु), मुंबई— ४०० ०९८ यांचे यांचे परिपत्रक क्र. १७५ कलिना/राष्ट्रीय मतदार दिवस/१०/२०२२ दिनांक ०७ जानेवारी, २०२२.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक २५ जानेवारी, २०२२ हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे. तरी सदर दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यत हा कार्यक्रम आपल्या विद्यार्थ्यासह ऑनलाईन पध्दतीने साजरा करावा हि विनंती. तसेच या अनुषंगाने आपण आपल्या महाविद्यालयामध्ये आपल्या स्तरावरून दिनांक २५ जानेवारी, २०२२ पुर्वी आपल्या महाविद्यालयात चित्रकला, निबंध, रांगोळी, वक्तृत्व, भित्तीपत्रक (पोष्टर), रील (एका मिनिटाचा व्हिडियो), मीम गाणे, विडंबन काव्य, घोषवाक्य इ. स्पर्धा ऑनलाईन आयोजित कराव्यात या स्पर्धांचे आयोजन आपल्या महाविद्यालयामधील निवडणुक साक्षरता मंडळातंर्गत करावे. यांच्यासाठी कोणकोणत्या विविध स्पर्धा आयोजित कराव्यात याबाबतच्या विषयांची यादी (परिशिष्ट— ६) सोबत जोडली आहे (प्रत संलग्न). सदरच्या स्पर्धा दिनांक २५ जानेवारी, २०२२ पुर्वी घेण्यात येवून, त्यांच्या १ व २ क्रमांकाच्या विजेत्यांची नावे आणि स्पर्धेच्या फोटोसह पूर्तता अहवाला दिनांक २१ जानेवारी, २०२२ पर्यत मतदार नोंदणी अधिकारी, १७५ — कलिना विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका मंडई, आराम सोसायटी लेन, सांताक्रुझ (पु), मुंबई— ४०० ०५५ या कार्यलयात सादर करावा.

दिनांक २१ जानेवारी, २०२२ या दिवशी मताधिकार, लोकशाही यांसंबंधी व्याख्याने/परिसंवाद यांचे आयोजन करावे.

ज्या महाविद्यालयात मतदार दिनाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, त्या महाविद्यालयाचे प्राचार्य, निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी, निवडणूक साक्षरता

मंडळाचे विद्यार्थी– सदस्य, विद्यार्थी – प्रमुख यांचे सहभागाने (निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन केले नसल्सास निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करावी. अशा मंडळाच्या सभासदांनी त्यांचे विद्यार्थी जीवनातील महत्व याविषयीचे मनोगन रेकॉर्ड करावे. तसेच आपल्या महाविद्यालयामधील निवडणूक साक्षरता मंडळाच्या प्रतिनिधींना यापुर्वी प्रशिक्षित केल्यानुसार त्यांनी नवमतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत कसे शोधायचे याविषयी प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन करावे.

यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन शाळा – महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचे मुख्य प्रयोजन निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करणे, हे असल्याचे सदर कार्यक्रमाच्या अहवालासोबतच आपल्या शाळा– महाविद्यालयांमधील निवडणूक साक्षरता मंडळाच्या संपर्काची यादी फॉरमॅटमध्ये मतदार नोंदणी अधिकारी, १७५ – कलिना विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका मंडई, आराम सोसायटी लेन, सांताक्रुझ (पु), मुंबई– ४०० ०५५ या कार्यलयात दिनांक २८ जानेवारी, २०२२ पर्यत पाठविण्यात यावी. (सदर यादीचा फॉरमॅट सोबत जोडला आहे. व यादीच्या संपर्कानुसार आपण त्यांचे व्हॉटसअॅप आणि टेलिग्राम गट तयार करावेत यांतील मोबाईल क्रमांक, मेल आयडी आणि इतर तपशिल अचूक आणि खरे असतील याची दक्षत घ्यावी.

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे व याबाबत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्यांनी वरील दिलेल्या सुचनांचे पालन करावे

सही/–
(सुधिर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई–४०० ०३२
21 जानेवारी, २०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

************

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:–**

१. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२
२. स्वीय सहाय्यक, प्र–कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२
३. स्वीय सहाय्यक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२

(सुधिर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई–४०० ०३२
21 जानेवारी, २०२२

IN·NO·628
10/1/2022

# मतदार नोंदणी अधिकारी

175- कालिना विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका मंडई, आराम सोसायटी लेन, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 055.
022-26670503
acmsd175@gmail.com

क्र. 175 कलिना/राष्ट्रीय मतदार दिवस/ १० /२०२२ दिनांक:- ०७ /०१/२०२२

UNIVERSITY
IS/ICD/EOD/20 /-
12 JAN 2022
18723
OF MUMBAI

PA to VC

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य, / कुलगुरु
मुंबई विद्यापीठ
कालिना

विषय :- दि.२५ जानेवारी २०२२ राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करणेबाबत.

संदर्भ :- जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. निवडणूक/मुंउजि-का-८/राष्ट्रीय म.दि.२०२१ दि.२२/१२/२०२१.

महोदय / महोदया,

मा.भारत निवडणूक आयोगाने दि.२५ जानेवारी, २०२२ हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे. तरी सदर दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत हा कार्यक्रम आपल्या विद्यार्थ्यांसह ऑनलाईन पद्धतीने साजरा करावा ही विनंती. तसेच या अनुषंगाने आपण आपल्या स्तरावरुन दि.२५ जानेवारी २०२२ पुर्वी आपल्या शाळेत /विद्यालय/महाविद्यालय/कॉलेजमध्ये चित्रकला,निबंध,रांगोळी, वक्तृत्व, भित्तीपत्रक (पोष्टर), रील (एक मिनिटाचा व्हिडिओ), मीम गाणे, विडंबन काव्य,घोषवाक्य, QUIZ इ.स्पर्धा ऑनलाईन आयोजित कराव्यात या स्पर्धांचे आयोजन आपल्या विद्यालय/महाविद्यालय/कॉलेजमधील निवडणुक साक्षरता मंडळांतर्गत करावे. शाळा / महाविद्यालय व कॉलेज यांच्यासाठी कोणकोणत्या विविध स्पर्धा आयोजित कराव्यात याबाबतच्या विषयाची यादी (परिशिष्ट -६) सोबत जोडली आहे. सदरच्या स्पर्धा दि.२५ जानेवारी २०२२ पुर्वी घेण्यात येवून, त्यांच्या १ व २ क्रमांकाच्या विजेत्यांची नावे आणि स्पर्धेच्या फोटोसह पूर्तता अहवाल दि.२१/०१/२०२२ पर्यंत या कार्यालयात सादर करावा.

दि.२५/०१/२०२२ या दिवशी मताधिकार, लोकशाही यांसंबंधी व्याख्याने/परिसंवाद यांचे आयोजन करावे.

ज्या महाविद्यालयात मतदार दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, त्या महाविद्यालयाचे प्राचार्य निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी, निवडणूक साक्षरता मंडळाचे विद्यार्थी - सदस्य,विद्यार्थी- प्रमुख यांचे सहभागाने (निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन केले नसल्यास) निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करावी. अशा मंडळाच्या सभासदांनी त्यांचे विद्यार्थी जीवनातील महत्व याविषयीचे मनोगत रेकॉर्ड करावे. तसेच आपल्या शाळेतील / विद्यालय / महाविद्यालय / कॉलेजमधील निवडणूक साक्षरता मंडळाच्या प्रतिनिधींना यापुर्वी प्रशिक्षित केल्यानुसार त्यांनी नवमतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत कसे शोधायचे याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करावे.

यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन शाळा - महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचे मुख्य प्रयोजन निवडणूक साक्षरता मंडळांचे सक्षमीकरण करणे, हे असल्याने सदर कार्यक्रमाच्या अहवालासोबतच आपल्या शाळा-महाविद्यालयांमधील निवडणूक साक्षरता मंडळाच्या संपर्काची यादी फॉरमॅटमध्ये या कार्यालयाला दि.२८ जानेवारी,२०२२ पर्यंत पाठविण्यांत यावी. (सदर यादीचा फॉरमॅट सोबत जोडला आहे.) व या यादीतील संपर्कानुसार आपण त्यांचे व्हॉटसअ‍ॅप आणि टेलिग्राम गट तयार करावेत यांतील मोबाइल क्रमांक,मेल आयडी आणि इतर तपशिल अचूक आणि खरे असतील याची दक्षता घ्यावी.

Modalar

सहायक मतदार नोंदणी अधिकारी
175 कलिना विधानसभा मतदार संघ, मुंबई

## परिशिष्ट ६

शाळा (इ. नववी व दहावी) आणि कनिष्ठ महाविद्यालये यांच्यासाठी विविध स्पर्धांच्या विषयांची सर्वसमावेशक यादी :

1. सक्षम लोकशाहीची पहिली पायरी - मतदार नोंदणी
2. वर्गप्रमुख पदाची निवडणूक मी अशी लढवणार...
3. माझा नगरसेवक/सरपंच असा हवा...
4. मी नगरसेवक/सरपंच झालो / झाले तर...
5. मी आमदार झालो / झाले तर...
6. माझा आमदार असा हवा...
7. मी खासदार झालो / झाले तर...
8. माझा खासदार असा हवा
9. एका बोटावरच्या शाईची किंमत?
10. मी मताधिकार बजावणार कारण...
11. अठराव्या वर्षाची जबाबदारी

वरिष्ठ महाविद्यालयांसाठी विविध स्पर्धा आणि विषयांची यादी :

अ. निबंध

1. मी मताधिकार बाजावणार कारण...
2. मताधिकाराची सक्ती करावी का?
3. सोहळा लोकशाहीचा जागर मताधिकाराचा
4. हक्क वंचितांचे मार्ग मताधिकाराचा
5. मी नव्या युगाचा / युगाची मतदार
6. शहरी मतदारांची अनास्था – कारणे आणि उपाय
7. मी माझं मत विकणार नाही!
8. एका बोटावरच्या शाईची किंमत?

आ. मीम

1. निवडणुकीच्या दिवशी फिरायला जाणारे लोक
2. सगळी व्यवस्था भ्रष्ट आहे असे समजून मताधिकार न बजावणारे लोक
3. मतदार नोंदणी न करणारे लोक
4. अठराव्या वर्षाची जबाबदारी - मतदार नोंदणी
5. माझ्या महाविद्यालयातील 18 वर्षे पूर्ण केलेल्या युवांनी मतदार नोंदणी करावी म्हणून...

इ. लघुपट

1. गोष्ट लोकशाहीची

2. मताधिकार हा माझा कायदेशीर अधिकार
3. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे महत्त्व
4. अपंगांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन
5. तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन

ई. वक्तृत्व

1. आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का?
2. ...म्हणून मी मताधिकार बजावतो / बजावते!
3. लोकशाही आणि तरुण मतदार
4. व्यवस्था बदलाचा राजमार्ग : मताधिकार
5. मताधिकाराची सक्ती करावी का?
6. सक्षम लोकशाहीची पहिली पायरी — मतदार नोंदणी

उ. चित्रकला

1. 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन
2. स्त्रियांना मतदार नोंदणीचे आवाहन
3. अपंगांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन
4. तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन

ऊ. घोषवाक्य

1. सर्वोत्कृष्ट शासनपद्धती — लोकशाही
2. 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणीचे आवाहन
3. मताधिकाराचे महत्त्व

ए. गाणे —

१. लोकशाही शासनपद्धतीचे फायदे
२. 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणीचे आवाहन
३. सक्षम लोकशाहीसाठी मताधिकाराचे महत्त्व

For Jr. Colle

| A) ELC-Future Voters for STD 9th to 12th (Secondary and Senior Secondary Level) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| SR. No. | Name of Constituency | Polling Center Nmber | Name and address of the Jr. College | Name of Nodal Officer (Teacher) | E-mail | Telephone Number and Mobile Number | Number of Members of 11th & 12th |
| | 175 Kalina Assembly Constituency | | | | | | |

**Note :** Email of Jr. college & Teacher to be given Separetaly Telephone No. of Jr. college & Mobile No. of Teacher to be given


Image © 2016 DigitalGlobe
Google E